# भोर संस्थानातील प्रशासकीय विभाग व अधिकारी

**प्रा.डॉ.आर.व्ही.ढेरे**
सहयोगी प्राध्यापक
इतिहास विभाग प्रमुख,
शंकरराव भेलके महाविद्यालय,
नसरापूर, ता.भोर, जि.पुणे.
मा. सदस्य : इतिहास अभ्यास मंडळ
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

भोर संस्थान हे आकाराने मोठे असले तरी उत्पादनाच्या मानाने लहान होते. परंतु मानाच्या दृष्टीने भोर संस्थानची जागा फार उंच होती. संस्थानचे एकूण क्षेत्रफळ १,४९९ चौ.मै. होते. त्यात पाच महाल, परगणा किंवा तालुके मिळून संस्थानातील गावांची संख्या एकूण ५०२ होती. कसबा भोर हे संस्थानच्या राजधानीचे ठिकाण होते.[१]

या दक्षिणी प्रांतात महाराष्ट्रात सातारा प्रांताचे एकूण क्षेत्रफळ ३,२४७ चौ.मै. होते. या सातारा प्रांतात भोर, फलटण, औंध, जत व अक्कलकोट अशा पाच जहागिरीचा समावेश करण्यात आलेला होता.[२]

सन १८४८ मध्ये दत्तक वारस विधानास परवानगी नाकारून सातारचे मराठी राज्य खालसा केले. त्यामुळे सातारा जहागिरीच्या अधिपत्याखाली असलेली सर्व जहागिरी (संस्थाने) सन १८४९ मध्ये ब्रिटीशांच्या वर्चस्वाखाली आली. त्यामध्ये भोर संस्थानही होते. ते पुढे सातारा कलेक्टरच्या नियंत्रणाखाली ठेवण्यात आले होते.[३]

सन १८८७ मध्ये पुन्हा बदल करुन भोर संस्थान सातारा कलेक्टरच्या नियंत्रणाखालून काढून ते पुणे कलेक्टरच्या नियंत्रणाखाली ठेवण्यात आले होत.[४]

**प्रशासकीय विभाग :–** भोर संस्थानचे राज्यकारभाराच्या सोयीसाठी संस्थानच्या एकूण प्रदेशाचे एकूण पाच विभागात विभाजन करण्यात आले होते. त्यास परगणा, महाल किंवा तालुका म्हटले जात होते. तसेच प्रत्येक महालात, परगण्यात किंवा तालुक्यात मौजा, मजरा अथवा वाडी असे प्रशासनाच्या सोयीसाठी विभाग करण्यात आले होते.[५]

**परगणा/तालुका :–** संस्थानचा राज्यकारभार सुरळीत चालविण्यासाठी प्रत्येक तालुक्याच्या कारभारासाठी अंमलदार नेमले होते. त्या प्रमुख अधिकाऱ्यास मामलेदार असे म्हटले जात असे. संस्थानच्या राजधानीचे ठिकाण भोर होते. तसेच शिरवळ, नसरापूर, कोळवण, वेल्हे व पाली ही तालुक्याच्या ठाण्याची गावे होती.[६]

**कसबा :–** भोर हे संस्थानच्या राजधानीचे ठिकाण होते. त्यास कसबा भोर असे देखील म्हटले जात होते. कसबा म्हणजे कसबी, हुन्नरी लोकांचे गाव या ठिकाणी आठवडी बाजार भरत असे आणि परिसरातील लोक बाजार□हाटासाठी कसब्याच्या गावात येत असत. [७]

**मौजे :–** भोर संस्थानातील आर्थिक आणि सामाजिक व्यवहाराच केंदबिंदू म्हणजे खेडे होते. खेडे गावांना मौजा असे दखील म्हटले जात होते. संस्थानातील लोकांचा शेती व्यवसाय हाच मुख्य व्यवसाय होता. खेड कर्यांचा उल्लेख ग्राम, देहे, मौजा, वाडी इ. विविध नावानी कागदोपत्री केल्याचे दिसून येते. पूर्वीच्या म्हणजे मूळ खेड्यास बुद्रुक असे संबोधले जात होते. तर विस्तारीत करण्यात आलेल्या खेड्यास खुर्द म्हणून ओळखले जात असे. संस्थानातील एखादे खेडे नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा एखाद्या कारणाने ओस पडले असेल तर ते पुन्हा बसविण्याची व्यवस्था दरबारामार्फत करण्यात येत असे.[८]

**प्रशासकीय अधिकारी/सनदी नोकर वर्ग :–** शिवाजी महाराजांनी स्वतंत्र राज्याच्या निर्मितीबरोबर राज्यकारभाराची सुदृढ व्यवस्था निर्माण केली होती. या राज्यकारभार

पध्दतीचा सर्वच इतिहासकारांनी उत्कृष्ट शासनव्यवस्था म्हणून उल्लेख केल्याचे आढळून येते. शिवाजी महाराजांनी अष्टप्रधानांनची नेमणूक केली होती. त्यापैकी पंतसचिव हे अष्टप्रधान मंडळातील तिसऱ्या दर्जाचे मंत्री होते. तत्कालीन श्रेष्ठ व्यक्ती या पदावर नेमून त्यास शुरनविस असे प्रधानपद दिले जात होते. शिवाजी महाराजांनी त्यालाच संस्कृत नामानिधान देऊन 'पंतसचिव' असे नाव ठेवले होते. पंतसचिव असा त्याला उल्लेख केलाजाई. [९]

संस्थानचे सर्व प्रकारचे अंतर्गत व परराष्ट्रीय अधिकार संस्थानाधिपती म्हणून ते उपभोगीत होते. संस्थानचा राज्यकारभार सुरळीत चालविण्यासाठी दरबारात कारभारी, सरसुभेदार, मामलेदार, मामलेदार, फौजदार, फडणीस, पागनीस इत्यादी अधिकारी मिळून राज्यकारभार चालविला जात असे. मात्र अंतिम अधिकार किंवा सत्ता पंतसचिवांना असे. [१०]

**कारभारी :–** भोर संस्थानाच्या राज्यकारभार व्यवस्थेमधील सर्वात महत्त्वाचा अधिकारी म्हणजे कारभारी किंवा मुख्य प्रधान होय. कारभारी हा पंतसचिव व प्रशासनातील महत्त्वाचा दुवा म्हणून काम पाहत असे. सदाशिव चिमणाजी पंतसचिव यांनी प्रथमच संस्थानात कारभारी पद निर्माण करुन सन १७५९ मध्ये सदाशिव रघुनाथ घाणेकर यास पहिला संस्थानाचा कारभारी म्हणून नेमले. [११]

भोर संस्थानात मुख्य कारभारी किंवा दिवाण पंतसचिव घराण्यात वेळोवेळी नेमले होते. संस्थानच्या दरबारात सर्व अधिकारी, सरदार इत्यादी यांच्यापेक्षा कारभाऱ्यास महत्त्वाचे स्थान होते. कारभाऱ्याची नेमणूक स्वतः पंतसचिव करीत असत. त्यामुळे योग्य व्यक्तीची कारभारी म्हणून निवड केली जात होती. संस्थानिकांना प्रत्येक कामाच्या बाबतीत सल्ला देणे, इतर सत्तांबरोबर तह करणे, युध्दाचे नियोजन करणे इत्यादी कामे कारभारी संस्थानिकांच्या मार्गदर्शनाखाली करीत होते. [१२] सन १८१८ मध्ये भोर त्यामुळे

संस्थानात बाजी मोरेश्वर याची कारभारी म्हणून नियुक्ती केलेली होती. म्हणजे संस्थानचा संपूर्ण कारभार सांभाळण्याची जबाबदारी कारभारी यांच्याकडे असे. सन १८७१ मध्ये भोर संस्थानचा कारभार कारभाऱ्यामार्फत व्यवस्थित चालविला जात आहे किंवा नाही. हे पाहण्यासाठी सातारचे कलेक्टर मे. बासवेल मुंबई सरकारचे पॉलिटिकल एजंट या नात्याने इंग्रज सरकारने संस्थानावर देखरेख ठेवून संयुक्त प्रशासन व्यवस्थेखाली कारभार पाहण्यास सुरुवात केली होती. नोव्हेंबर सन १८८७ मध्ये भोर संस्थान सातारा कलेक्टरच्या नियंत्रणाखालून काढून ते पुणे कलेक्टरच्या नियंत्रणाखाली ठेवण्यात आले.[१३] सन १९२५ मध्ये काम करीत असलेले कारभारी गणेश हरी अंजनगावकर यांचीच पुढे सन १९२७ पासून भोर संस्थानचे 'दिवाण' म्हणून नियुक्ती करण्यात आली. अशा प्रकारे संस्थानातील कारभारी हे पद जाऊन त्याऐवजी दिवाण या पदाची निर्मिती झाली.[१४]

**सरसुभेदार** :– भोर संस्थानात कारभारी पदाबरोबरीचे प्रशासन व्यवस्थेतील एक अत्यंत महत्वाचे प्रशासकीय अधिकारी म्हणून 'सरसुभेदारांचा' उल्लेख करावा लागतो. संस्थानच्या सर्व मुलकी कामाची माहिती संस्थानिकांना पोहचविण्याची कामे सरसुभेदाराकडे होती. सन १८७१ मध्ये श्रीमंत शंकरराव पंतसचिव यांनी सरसुभेदाराची नवीन जागा निर्माण केली. संस्थानचे कारभारी रजेवर गेले किंवा दुसऱ्या काही महत्वाच्या कामाकरिता त्यांची नियुक्ती झाली असता त्यांचे सर्व कामे सरसुभेदारच पाहात होते. संस्थानात या जागेवर बाळासाहेब गाडेकर, यांची सरसुभेदार म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.[१५]

**चिटणीस** :– संस्थानातील चिटणीस पद हे प्रधान मंडळाबाहेरचे होते. पंतसचिवांना छत्रपतीस किंवा प्रधानास पत्र पाठवावयाचे झाल्यास त्याचे मसुदे तयार करुन ते पंतसचिवांना दाखवून त्याप्रमाणे ते पत्र लिहिण्याचे काम चिटणीस करीत असे. म्हणजे सरकारी दप्तराचा बहुतेक भाग चिटणीसाला सांभाळावा लागत असे. चिटणीसाला

कारभाऱ्याप्रमाणेच मानपान मिळत असे कारण पंतसचिवांचा खास पत्रव्यवहार व राजनैतिक पत्रव्यवहार लिहिण्याचे काम त्याच्याकडे असे. संस्थानामध्ये रामचंद्र बल्लाळ आगाशे चिटणीस म्हणून काम करीत होते.[१६]

**दप्तरदार :–** भोर संस्थानातील जमाबंदीचे वसुलीचे काम दप्तदाराकडे होते. प्रत्येक परगण्याचे किंवा तालुक्याकडे अथवा गावाकडे किती येणे, वसूल किती गोळा झाला, बाकी किती राहिली, त्याचा हिशोब ठेवून वसूलीची तजवीज करणे व त्याचा दरमहा पंतसचिवांना हिशोब देणे हे काम दप्तरदाराला करावे लागत असे. या शिवाय दप्तरदाराकडे जकातीचे मक्ते ठरवून देणे, गाव कामगाराच्या दप्तराची तपासणी करणे, त्याच्याकडून हिशोब घेणे, तसेच संस्थानातील सर्व प्रकारचे कागद, इनामे, जहागिऱ्या इ. कागदपत्रे दप्तरदाराला संभाळावे लागत होते. संस्थानात रघूनाथ धोंडिबा चित्रे. [१७] यांची दप्तरदार म्हणून नेमणूक करण्यात आली होती. मात्र पुढील काळातील कागदपत्रात दप्तरदाराचा उल्लेख येत नाही. अथवा या दप्तरदाराचे काम एखाद्या खात्याकडे सोपवले असावे.

**पागनीस :–** भोर संस्थानचे संस्थापक श्रीमंत शंकराजी नारायण पंतसचिव यांच्या काळात संस्थानची पागा व काम करणाऱ्या इसमांची संख्या बरीच मोठी होती. या पागेमुळे पंतसचिवांना आपल्या ताब्यातील प्रदेशाचे संरक्षण करुन संस्थानात शांतता ठेवण्याच्या कामी उपयोग होत असे. मात्र देशात इंग्रजी सत्तेचा अंमल प्रस्थापित झाल्यानंतर संस्थानचा राज्यकारभार इंग्रजांच्या नियमानुसार चालू लागल्याने मोठी पागा बाळगण्याची गरज भासत नव्हती. सदाशिव बाळकृष्ण महाबळेश्वर, वि.स. पोतनीस, वामन आबा पाटकर इत्यादीनी अनुक्रमे पागनीस म्हणून काम केलेले होते.[१८] या खात्याकडे राजवाडा संरक्षणाचे व शहर संरक्षणाचे काम होते. वेळप्रसंगी पागेतील घोडेस्वारांना पोलीस खात्याच्या मदतीला जावे लागत होते.

**पोतनीस :–** भोर संस्थानातील सर्व आवक-जावक या खात्याकडे सोपविण्यात आलेली होती. सरकारी खजिन्यात जमा होणारा सर्व पैसा लिहून त्याचा हिशोब ठेवणे, तसेच खजिन्यातून पैसा द्यावयाचा असेल तर त्याची पावती लिहून देणे हा सर्व जमा-खर्च ठेवून हुजरात हिशोब पाठविणे, वसुलीसंबंधीचे सर्व दप्तर व रोकड सांभाळणे, खजिन्यावर देखरेख करणे, पंतसचिवांचे मौल्यवान रत्नाचे, सोन्या-चांदीचे दागिने व भांडी त्याचे एकूण नग व त्या वस्तूंची व्यवस्था ठेवण्याचे काम पोलनीसाकडे असे. संस्थानात सन १८८८ मध्ये रामचंद्र त्रिंबक पोतनीस हे पोतनीस म्हणून काम करीत होते.[१९]

**कोठनीस :–** कारखान्यात रोज जे सामान लागत असे ते सर्व सामान कोठारात ठेवले जात असे. त्याचप्रमाणे श्रीमंत पंतसचिव यांच्या कुटूंबासाठी ज्या वस्तू खरेदी कराव्या लागत त्या स्वतः कोठनीस करीत असे. या वस्तूही कोठनीसाच्या ताब्यात असत. कोणत्याही सामानाची नासधूस होऊ नये, ते चांगल्या स्थितीत रहावे. कोठी सांभाळण्याचे महत्वाचे काम कोठनीसाला करावे लागत होते. संस्थानात लक्ष्मण सखाराम कोठनीस, हरी वासुदेव लिमये हे कोठनीस कामगार म्हणून कामावर होते.[२०]

**शिबंदी :–** भोर संस्थानिकांनी जनतेच्या संरक्षण व्यवस्थेकरिता हे खाते होते. या खात्यामार्फत अरब, मौलाद, बाणदार व पोलीस यांना प्रशिक्षण दिले जात होते. या विभागाकडे आधुनिक बंदुका होत्या. या शिबंदी खात्यात दोनशे पन्नास शिपाई होते. तसेच पुरूषोत्तम दामोदर सबनीस हे शिबंदी खात्याचे प्रमुख म्हणून काम करीत होते.[२१]

याशिवाय संस्थानास फरसखाना, बिलवर, जवाहीरखाना होता. या विभागाकडे नवीन सामान खरेदी व जुन्या समानाची दुरूस्ती करणे तसेच कारखान्यात चांदीच्या खुर्च्या, सिंहासन खुर्ची, श्रीमंत पंतसचिवांची उंची कापडांची व्यवस्था ठेवणे, हे काम जवाहीरखान्यातील मौल्यवान रत्नांचे साहित्य, सोन्या-चांदीची भांडी, मौल्यवान

दाग�दागिने यांची व्यवस्था ठेवणे, जरुरीपुरते दाग�दागिने व भांडी खरेदी करणे इ. कामे या कारखान्याकडे होती.[२२]

**मामलेदार :–** भोर संस्थानचे राज्यकारभाराच्या व्यवस्थेसाठी सर्व प्रदेशाचे पाच विभाग केले होते. त्यास परगणे किंवा तालुके म्हटले जात होते. या विभागावर एक एक असे पाच अंमलदार नेमले होते. त्यांना 'मामलेदार' असे म्हणत. प्रत्येक तालुक्यात मामलेदार, फडणीस व फौजदार असे तीन मुख्य अधिकारी नेमले होते. त्यापैकी मामलेदार हे तालुक्याची सर्व व्यवस्था असे मामलेदार हा पगारी अधिकारी होता. त्याच्या मदतीस देशमुख व देशपांडे हे अधिकारी असत. वर्षा अखेर वसूल झाल्यावर मामलेदाराने वसूली हिशोबाचे कागद श्रीमंत पंतसचिवांकडे पाठवावे हे काम मामलेदाराकडे होते.[२३]

संस्थानातील तालुक्याचे मुलकी, दिवाणी व फौजदारी इ. कामाचे अधिकार तालुकयाच्या एकट्या मामलेदाराकडे असत. मामलेदार हा जमाबंदीच्या कामासाठी तालुक्यातील गावांना भेट देण्यासाठी जात असे. तसेच तालुक्यातील सर्व कचेऱ्यांच्या कामकाजावर त्याची देखरेख असे. म्हणून मामलेदार तालुका प्रशासन व्यवस्थेतील एक अत्यंत महत्त्वाचा महसूल गोळा करणारा व प्रशासकीय अधिकारी असल्याचे दिसून येत होते. सन १८७४ मध्ये विचित्रगड तालुक्यात मामलेदार म्हणुन गोविंद नारायण लिमये मामलेदार म्हणुन नियुक्ती करण्यात आली होती.[२४] संस्थानिक स्वतः मामलेदाराची नियुक्ती करत असताना त्यांची पात्रता पाहून नेमणूक करीत असत.

**कमाविसदार :–** भोर संस्थानात प्रमुख रेव्हेन्यू अधिकारी म्हणून 'कमाविसदार' काम करीत असे. कमाविसदाराची नेमणूक संस्थानातील लहान लहान पोट विभागात केलेली असे. प्रत्येक तालुक्यातील रयतेची स्थिती समजावून घेण्यासाठी तो संस्थानातील तालुक्यांच्या गावी जावून वसूलीचे अंदाज पत्रक तयार करीत असे. कमाविसदाराचा

व्यवस्थापक अथवा वहिवाटदार असाही उल्लेख केलेला आढळतो. सन १८२३ मध्ये मौजे वेळू येथे कृष्णाजी गंगाजी कमाविसदार म्हणून काम करीत होते.[२५] त्यांना रोख पगार दिला जात असे. १८८९ च्या पुढील कागदपत्रांमध्ये कमाविसदाराचा उल्लेख आढळून येत नाही. पुढे महसुल अधिकारी म्हणून संस्थानात दप्तरदाराचा उल्लेख येतो. त्याच्या हाताखाली अव्वल कारकून नेमले होते.

**फडणीस :–** सन १७७०–७१ मधील अनेक कागदपत्रातून फडणीसाच्या व त्याच्या अधिकारांविषयी उल्लेख सापडतात. त्यावरून फडणीसाला महालाचा दैनंदिन हिशोब ठेवणे, महालासाठी नव्याने नेमलेल्या व जुन्या शिपायांच्या खर्चाचा हिशोब ठेवणे, हजेरी पत्रक तयार करुन ते स्वतःजवळ ठेवणे, महालाच्या जमीन महसूलाच्या हिशोबाची कागदपत्रे सांभाळणे, महालातील अधिकाऱ्यांना, नोकरांना, चाकरांना सरकारच्या आदेशासंबंधी पत्रे लिहिणे इ. कामे फडणीसाला करावी लागत असत.[२६]

संस्थानात फडणीसाला अव्वल कारकून असेही म्हटले जात होते. सन १८८० मध्ये विचित्रगड तालुक्यात बाळाजी भैरव निमकर हे मामलेदाराचा मदतनीस म्हणुन काम पाहत असे.[२७] यावरुन असे म्हणता येते की, संस्थनिकांना कमाविसदाराचे काम सदर अव्वल कारकूनाकडे दिल्याने संस्थानाच्या कागदपत्रामध्ये कमाविसदाराचे नाव आढळून येत नाही.

**फौजदार :–** भोर संस्थानात प्रत्येक तालुक्यातील प्रशासन व्यवस्थेमधील तिसऱ्या दर्जाचा अधिकारी म्हणून फौजदाराचा उल्लेख येतो. फौजदाराकडे तालुक्याच्या बंदोबस्ताचे काम असे. तसेच तो मामलेदाराच्या हुकूमाप्रमाणे तालुक्याच्या बंदोबस्ताचे व शांतता राखण्याचे काम करीत असे. फौजदार हा पगारी नोकर होता. सन १९११ मध्ये हैबतराव विश्वनाथ व त्रिंबक सिद्धेश्वर कांगो हे फौजदार म्हणून काम करीत होते.[२८]

**गावकामगार पाटील :–** मराठी राज्यकारभारात खेडे एक महत्त्वाचा भाग असे. हा राज्यघटनेतील शेवटचा घटक होता. खेडेगावची व्यवस्था पाहणारे निरनिराळे घटक असत. प्राचीन काळापासून गावकामगार, म्हणून पोलीस पाटलाला राजकिय व सामाजिक बरेच महत्त्व प्राप्त झालेले होते. मुकादम हा किताब पाटलाला असे. पाटील राज्यव्यवस्थेतील एक महत्त्वाचा दुवा मानला जात असे. भोर संस्थानात पाटील असा उल्लेख आलेला आहे. पाटील हा गावातील राजाचा प्रतिनिधी होता. [२९]

एकंदरीत पाटील हा जितका सरकारचा अधिकारी तितकाच तो रयतेचा कैवारी होता. गावात ज्या जातीचा जास्त भरणा असतो त्या जातीचा पाटील असतो. काही ठिकाणी ब्राह्मण, मुसलमान पाटील होते. सन १८७९ मध्ये श्रीमंत शंकरराव पंतसचिव यांनी भोर संस्थानातील तालुके राजगड मौजे खोपी येथील हैबतराव इंदूलकर पाटील यास ७५ टक्के जमीन इनाम दिली. [३०] थोडक्यात पाटील हा खेड्याचा मुख्य वतनदार असे. तो संस्थानिक व खेडे यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा होता.

**कुलकर्णी :–** पाटील □कुलकर्णी गाव कामगारात प्रमुख होते. कुलकर्णी हा पाटलाच्या खालोखाल गावचा दुय्यम दर्जाचा अधिकारी होय. प्रत्येक गावात पाटील हा राजा तर कुलकर्णी हा प्रधान असे म्हटले जात असे. [३१] कुळवार गावचा हिशोब लिहिणारा तो कुलकर्णी. बहुतेक कुलकर्णी ब्राह्मण, काही प्रभू तसेच मराठे, लिंगायत व मुसलमान असत. [३२] सन १८२३ मध्ये मौजे नांदगाव येथे विठोजी बाबु कुलकर्णी व मौजे सांगवी येथे आबा कुलकर्णी हे कुलकर्णी म्हणून काम करीत होते. [३३] पाटीलाच्या खालोखाल कुलकर्ण्यालाही महत्त्व असे. कुलकर्णी गावाच्या दप्तराचे सर्व काम करीत त्याच्या मार्फत गावचा सर्व सरकारी व्यवहार चालत असे.

**शेटे महाजन :–** प्रशासनाच्या कामात शेटे महाजन यास महत्त्वाचे स्थान होते. कसब्याच्या पेठेचे ते वंश परंपरागत अधिकारी असत. एखाद्या गावात बाजार भरत

नसल्यास तो सुरू करणे, आपले रास्त माप व वजन कोणी वापरण्यासाठी मागितल्यास ते देणे इ. कामे शेट्याची असत व पेठेचे हिशोब ठेवण्याचे काम महाजन याचे असे.[३४] शेटे महाजन यांना गाव कामगारासारखेच हक्क मिळत असत. सन १८२१ मध्ये पांडुरंग संपत शेटे हे नसरापूर या ठाण्याच्या गावात शेटे महाजन म्हणून काम करीत होते. त्यांना तेथील सर्व बाजारपेठेचा हक्क होता. नसरापूर आठवडी बाजारातून पेण व पनवेल येथे बैल पाठविण्यात आले.[३५] याबाबत खुलासा करण्याचे पत्र नसरापूर येथील शेटे महाजन यांनी दिले. सन १९३७ मध्ये संस्थानात वजनमापे कायदा पास करण्यात आला त्यानंतर वजनमाप अधिकाऱ्यांमार्फत संस्थानातील कामकाजाची देखरेख पाहण्यात येऊ लागली. परिणामी संस्थानातील शेटे महाजन यांचे महत्त्व कमी कमी होत गेले.[३६]

**नाईकवडी :–** तालुक्याच्या किंवा परगण्याच्या ठिकाणी नाईकवडी हे वतनदार असत. ते तालुक्याच्या ठिकाणी कसबा किंवा मौजे येथे दर आठवडी बाजाराच्या दिवशी बंदोबस्त ठेवण्याचे काम करीत असत. तसेच ‘नायकवडी’ म्हणजे सर्व्हेअर होय शेखदार म्हणजे ‘कारकून’ होय. सन १८२४ मध्ये मौजे कांजळे येथे अमीरखान नायकवडी, नायकवडी म्हणून काम करीत असे.[३७] तो आठवडी बाजाराच्या दिवशी हक्क वसूल करीत असे.

**देशमुख/देशपांडे :–** देशमुख देशपांडे हे देशाधिकारी होत. या ठिकाणी देश या शब्दाचा अर्थ मर्यादित घेतला पाहिजे. साधारपणे परगणा किंवा तालुका एवढ्या प्रदेशास देश समजत असत. देशमुखी वतन सामान्यपणे मराठा समाजाकडे असे. ते परगण्याच्या ठिकाणी राहून मामलेदारास मदत करीत असत. गावात जे काम पाटील कुलकर्णी यांचे तेच काम देशात देशमुख व देशपांडे यांचे असे. पाटील कुलकर्णी यांनी गावचा वसूल करावयाचा व गावोगावच्या पाटील कुलकर्ण्यांनी जमविलेला पैसा देशमुख व देशपांडे यांच्याकडे द्यावयाचा.[३८] पुढे ब्रिटिश सरकार व पंतसचिव यांच्यात सन १८२० मध्ये तह झाला या तहामध्ये श्रीमंत पंतसचिव यांचा देशमुख व जहागिरदार असा उल्लेख केल्याचे

आढळून येते.[३९] सन १८२४ मध्ये मौजे कांजळे येथे नारायण देशपांडे यांच्याकडे देशपांडेपणाचे वतन होते.

**कलेक्टर पदाची निर्मिती :–** भोर संस्थानातील हा सर्वात प्रमुख महसूल अधिकारी होय. संस्थानात 'कलेक्टर' पदाची निर्मिती सन १९३४ मध्ये करण्यात आली व या जागेवर श्री.ए.एन.हुल्ल्याळ यांची नियुक्ती करण्यात आली.[४०] संस्थानच्या कारभारावर व सर्व महसूल अधिकारीवर्गावर यावर कलेक्टरचे नियंत्रण होते. याशिवाय कलेक्टर हा संस्थानचा 'लँड रेकॉर्ड' विभागाचा प्रमुख म्हणून काम पाहात असे. कलेक्टरच्या मार्गदर्शनाखाली मामलेदार व फडणीस हे महसूल अधिकारी म्हणून काम पाहत होते. परंतु कलेक्टर हे संस्थानचे अधिपती यांच्या सल्ला–मसलतीने दैनंदिन कामकाज पाहत होते.

**संदर्भसूची :–**


१) भोर संस्थानचा भूगोल, पृ. ५.

२) Imperial Gazetteer of India, P.No. 507

३) Gazetteer of Satara Vol – II – P.No. 617

४) Bombay Presidency Administration Report – 1887-18- P.N. 28

५) पंतसचिव जमाव दप्तर □रुमाल नं.१२

६) भोर संस्थानचा भूगोल, पृ. ७

७) वा. क्र. भावे, पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ. ३६४

८) पंतसचिव जमा दप्तर, रुमाल नं.१९

९) प्रा.टि.के.बिरादार, मराठ्यांचा इतिहास, पृ. ४४२

१०) अ.ना.भागवत, भोर संस्थानचा इतिहास, पृ. ३६

११) कित्ता

१२) भोर तहसिल रेकॉर्ड ऑफीस फाईल नं. ११

१३) अ.ना.भागवत, भोर संस्थानचा इतिहास, पृ. १५६

१४) भोर तहसिल रेकॉर्ड ऑफीस फाईल नं.२७.

१५) अ.ना. भागवत, भोर संस्थानचा इतिहास, पृ. २९६

१६) वा.ना.जोशी, श्रीमंत राजा रघुनाथराव चरित्र खंड २, पृ. ८६२

१७) अ.ना. भागवत, भोर संस्थानचा इतिहास, पृ. ३२५

१८) अ.ना.भागवत भोर संस्थानचा इतिहास, पृ. ३२७

१९) वा.ना.जोशी, श्रीमंत राजा रघुनाथराव चरित्र खंड ४, पृ. ८४२

२०) वा.ना.जोशी, श्रीमंत राजा रघुनाथराव चरित्र खंड ४, पृ.८६६

२१) अ.ना..भागवत, भोर संस्थानचा इतिहास, पृ. ३१

२२) वा.ना.जोशी, श्रीमंत राजा रघुनाथराव चरित्र खंड ३, पृ. ८६५

२३) भोर तहसिल रेकॉर्ड फाईल नं. ११

२४) अ.ना..भागवत, भोर संस्थानचा इतिहास, पृ. २९६

२५) पंतसचिव जमाव दप्तर रुमाल नं.१५

२६) प्रा.सावंत/प्रा.जाधव, मराठ्यांचा प्रशासकीय सामाजिक व आर्थिक इतिहास □ १९९७ नागपूर, पृ. ६१

२७) वा.ना.जोशी, श्रीमंत राजा रघुनाथराव चरित्र खंड ४, पृ. ८४४

२८) अ.ना..भागवत, भोर संस्थानचा इतिहास, पृ. २६०

२९) पंतसचिव जमाव दप्तर रुमाल नं. ४

३०) पंतसचिव जमाव दप्तर, रुमाल नं.६

३१) वा.कृ.भावे, पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ. ३७२

३२) वा.कृ.भावे, पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ.

३३) पंतसचिव जमाव दप्तर रुमाल नंबर ४

३४) वा.कृ.भावे, पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ. ३४१

३५) पंतसचिव जमाव दप्तर रुमाल नं. १९

३६) Annual Administration Report of Bhor State 1928-29, P.No. 5

३७) पंतसचिव जमाव दप्तर रुमाल नं. ४

३८) वा.कृ.भावे, पेशवेकालीन महाराष्ट्र, पृ. ३७२

३९) Treaties, Engagements & Sanadas, Vol. VII, P.No. 137

४०) Annual Adminstration Report of the Bhor State– 1933-34, P.No. 10